THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 14TH AUGUST 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल यांच्या कायदे व कानू करावयाच्या कौन्सिलांत खालीं दिलेला आक्टाचा मसुदा तारीख ३ माहे जुलै सन १८९० रोजीं रुजू करण्यांत आला :—

### सन १८९० चा आक्टाचा मसुदा नंबर ८.

#### सन १८७१ चा गुरांच्या अतिक्रमणाविषयींचा आक्ट सुधारण्याबाबत आक्टाचा मसुदा.

सन १८७१ चा गुरांच्या अतिक्रमणाविषयींचा आक्ट सुधारणें ज्याअर्थी योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

१. सदरील आक्टाच्या १ ल्या कलमाऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें : — सन १८७१ चा आक्ट १, कलम १, या ऐवजीं नवीन कलम दाखल करणें.

"१. (१) या आक्टास "सन १८७१ चा गुरांच्या अतिक्रमणाविषयींचा आक्ट" असें ह्मणावें; आणि सरनामा व व्याप्ति.

(२) तो, इलाक्याचीं मुख्य शहरें खेरीज करून, आणि स्थानिक सरकार, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची अगोदर मंजुरी घेऊन आणि सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, ज्या प्रदेशांस तो लागू नाहीं असें वेळोवेळीं ठरवील ते प्रदेश खेरीज करून, सगळ्या ब्रिटिश इंडियास लागू आहे.

(३) पोट-कलम (२) याअन्वयें दिलेला जाहिरनामा कोणत्याहि वेळीं रद्द करण्याचा अगर त्यांत फेरफार करण्याचा स्थानिक सरकारास अख्त्यार आहे.

२. (१) सदहू आक्टाच्या १२व्या कलमाचा पहिला पारिग्राफ, ज्यांत, कोंडवाड्यांत घातलेले प्रत्येक गुराबद्दल कोंडवाडेवाल्यानें कोणत्या परिमाणाअन्वयें दंड घ्यावा हें सांगितलें आहे, त्यांत, खालीं दिलेला विशेष ठराव जास्त दाखल करावा: तो विशेष ठराव येणेंप्रमाणें :— सन १८७१ चा आक्ट १, कलम १२, यांत जास्त मजकूर दाखल करणें.

" मात्र इतकेंच कीं, कोणत्याहि जिल्हा माजिस्ट्रेटाच्या रिपोर्टावरून, अगर सन १८८३ चा आक्ट १८ वा (सन १८७१ चा गुरांच्या अतिक्रमाणाविषयींचा आक्ट सुधारण्याविषयीं आक्ट) यांत व्याख्या केलेल्या कोणत्याहि स्थानिक अधि-

काऱ्याच्या यादीवरून स्थानिक सरकारास जर असें दिसून आलें कीं, त्या माजिस्ट्रेटाच्या अगर अधिकाऱ्याच्या अधिकारांत असलेल्या प्रदेशांत, गुरांना जमिनीवर अतिक्रमण करूं देऊन त्या जमिनीवरच्या पिकांचें अगर इतर मालाचें नुकसान करूं देण्याची लोकांस खोड आहे, तर, त्या स्थानिक सरकास, सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन असा हुकुम करण्याचा अख्त्यार आहे कीं, त्यांत निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक जातीचें जें कोणतेंहि गुरूं सदरील प्रदेशांत धरलें जाऊन सदरीं सांगितल्याप्रमाणें कोंडवाड्यांत घातलें जाईल, त्या प्रत्येक गुराबद्दल, कोंडवाडेवाल्यानें, त्या जाहिरनाम्यांत निर्दिष्ट केलेला दंड घ्यावा; मात्र तो दंड सदरीं दिलेल्या परिमाणाच्या दुपटीपेक्षां जास्त नसावा."

(३) त्याच कलमाच्या तिसऱ्या पारिग्राफानंतर खालीं दिलेला मजकूर जास्त दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें :--

"या कलमाच्या पहिल्या पारिग्राफाच्या विशेष ठरावाअन्वयें प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्यावरहुकुम, त्या पारिग्राफांत दिलेल्या परिमाणांत निर्दिष्ट केलेल्या दंडापेक्षां जास्त दंड घेतला जाईल तेव्हां, तो दंड ज्या मनुष्याकडून घेतला असेल त्यानें त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास अगर याबाबतींत साधारणपणें अगर विशेषत: अधिकार दिलेल्या कोणत्याहि माजिस्ट्रेटास त्याच्या खात्रीलायक कारण दाखविलें तर, सदरीं दिलेल्या परिमाणाबरहुकुम घ्यावयाच्या दंडापेक्षां जितका जास्त दंड त्याजकडून घेतलेला असेल, तितका परत देण्याबद्दल हुकुम करण्याचा त्या माजिस्ट्रेटास अख्त्यार आहे.

"या कलमाच्या पाहिल्या पारिग्राफाच्या विशेष ठरावाअन्वयें जाहीर केलेला कोणताहि जाहिरनामा, सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन कोणत्याहि वेळीं रद्द करण्याचा अगर त्यांत फेरफार करण्याचा स्थानिक सरकारास अख्त्यार आहे."

सन १८७१ चा आक्ट १, कलम २५, याची सुधारणा.

३. सदहू आक्टाच्या २५व्या कलमाच्या प्रारंभीं खालीं दिलेला मजकूर जास्त दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें :--

"लगत पुढच्या कलमाअन्वयें अगर".

सन १८७१ चा आक्ट १, कलम २६ यांत जास्त मजकूर दाखल करणें.

४. सदहू आक्टाच्या २६व्या कलमांत खालीं दिलेला मजकूर जास्त दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें :—

"स्थानिक सरकारास, सरकारी गॅझेटांत जाहिनामा देऊन, त्या जाहिनाम्यांत निर्दिष्ट केलेल्या प्रदेशाच्या संबंधानें वेळोवेळीं असें ठरविण्याचा अख्त्यार आहे कीं, या कलमाच्या पूर्वीच्या भागाचा अर्थ, तो भाग केवळ डुकरांस लागू नसून साधारणपणें सर्व गुरांस अगर त्या जाहिरनाम्यांत निर्दिष्ट केलेल्या जातीच्या गुरांस लागू आहे अगर त्यांतले "दाहा रुपये" हे शब्द काढून त्यांच्या जागीं "पंचवीस रुपये" हे शब्द दाखल केले आहेत, अगर त्यांत हे दोन्ही फेरफार केले आहेत, असा करावा.

या कलमाअन्वयें जाहीर केलेला कोणताहि जाहिरनामा, सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन कोणात्यहि वेळीं रद्द करण्याचा अगर त्यांत फेरफार करण्याचा स्थानिक सरकारास अख्त्यार आहे."

सुरुवात व अमलांत येणें.

५. हा आक्ट, तारीख १ माहे जानेवारी सन १८९१ या रोजीं अमलांत येईल; आणि सन १८८३ चा आक्ट १८ वा (सन १८७१ चा गुरांच्या अतिक्रमणाविषयींचा आक्ट सुधारण्याविषयीं आक्ट) याचा हवाला, या आक्टावरून सुधारलेल्या सन १८७१ च्या गुरांच्या अतिक्रमणाविषयींच्या आक्टावर आहे असें समजावें.

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

या देशाच्या कांहीं भागांत, गुरांचे धनी, त्यांचीं गुरें अतिक्रम करूं लागलीं असतां त्यांस प्रतिबंध करीत नाहींत, इतकेंच नाहीं, तर त्यांकडून मुद्दाम अतिक्रम करवितात. अशा गुरांच्या बाबतींत जितकी शिक्षा होणें योग्य असतें तितकी सन १८७१ चा गुरांच्या अतिक्रमणाविषयींचा आक्ट याअन्वयें देतां येत नाहीं अशा तक्रार हिंदुस्तान सरकाराकडे अनेक वेळां आली आहे.

आलीकडे, सदरील प्रकारच्या तक्रारी दक्षिण हिंदुस्तान आणि वऱ्हाड या प्रदेशांतून पुनः आलेल्या असून पश्चिम हिंदुस्तानांतूनहि त्याच प्रकारचे रिपोर्ट हिंदुस्तान सरकाराकडे आले आहेत. ह्मणून आतां हा आक्टाचा मसुदा कौन्सिलांत रुजू करावा असा ठराव झाला आहे. गुरांच्या अतिक्रमणाबद्दल मूळ कायद्यांत जी शिक्षा ठरविली आहे तिच्या पेक्षां जास्त शिक्षा विशेष प्रदेशांत देण्याचा ठराव करण्याचा अधिकार स्थानिक सरकारास देण्याचें या मसुद्यांत योजिलें आहे.

(सही.) फिल पी. हचिन्स,

तारीख ३० माहे जून सन १८९०.

(सही.) एस्. हार्वे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्तान सरकार.

(True Translation.)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.